108 (24)

क्रमांक : एलसीएस २६९४/प्र.क्र. ५४५७/ज-३
**महसूल व वन विभाग,**
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक :- १५ एप्रिल २००२

**विषय :- जमीन मुंबई - उपनगर जिल्हा**
मौजे परिघखाडी, स.नं. ४ पै, न.भू.क्र. ८ पै
८५३.६ चौ.मी. जमीन गुरुकृपा सहकारी
गृहनिर्माण संस्थेस मंजूर करणेबाबत.

**ज्ञापन :-**

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना वरील विषयासंबंधीच्या त्यांच्या क्रमांक ०७/३ अ/एफ ०१५२ दिनांक १४-९-२००० च्या पत्रास अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, गुरुकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था या संस्थेस तिच्या १३ सभासदांच्या निवासाची व्यवस्था करण्याकरीता मौजे परीघखार येथील स.नं. ४ पै, न.भू.क्र. ८ पै, मधील ८५३.६ चौ.मी. जमीन ( यापैकी मिठी नदीच्या चॅनलायझेशनसाठी व लाकडी बांधासाठी लागणारी जमीन वगळून ) मंजूर करण्याचा शासनाचा हेतू असल्याचे हेतूपत्र समक्रमांकाच्या दिनांक १२-१२-१९९४ अन्वये देण्यात आले होते. त्यानंतर सदर हेतूपत्र रद्द करुन विषयांकित जमीन सूर्यप्रकाश सहकारी गृहनिर्माण संस्थेस निवासी प्रयोजनाकरीता देण्याचा शासनाचा हेतू असल्याचे हेतूपत्र समक्रमांकाच्या दिनांक १८-१२-१९९६ अन्वये देण्यात आले. शासनाच्या वरील निर्णयाविरुध्द गुरुकृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक ३४४/९७ आणि १२९/९८ या मध्ये न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे शासन स्तरावर सर्व संबंधीतांना पुन्हा सुनावणीची संधी देण्यात आली. या प्रकरणी मा. मंत्री (महसूल) यांनी सूर्यप्रकाश सहकारी गृहनिर्माण संस्था यांना समक्रमांकाच्या दिनांक १८-१२-१९९६ अन्वये दिलेले हेतूपत्र रद्द करुन गुरुकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था यांना समक्रमांकाच्या दिनांक १२-१२-१९९४ अन्वये दिलेले हेतूपत्र कायम करण्याचा व दिनांक १८-६-१९९६ च्या पत्रान्वये दिलेले स्थगिती आदेश उठविण्याचा निर्णय दिनांक १३-४-२००० रोजी दिला. सदर निर्णय सर्व संबंधीतांना शासन पत्र महसूल व वन विभाग क्रमांक एस ३०/एलसीएस २६९८/प्र.क्र. ७४९५/ज-३ दिनांक १३-४-२००० च्या पत्रान्वये कळविण्यात आला आहे. शासनाचा वरील निर्णय विचारात घेता आता शासन पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

गुरुकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था या संस्थेस तिच्या परिशिष्ट " अ " मध्ये नमूद केलेल्या १० शासन मान्यता प्राप्त सभासदांच्या निवासाची व्यवस्था करण्याकरीता मौजे परिघखाडी येथील स.नं. ४ पै, न.भू.क्र. ८ पै मधील ८५३.६ चौ.मी.जमीन ( यापैकी मिठी नदीच्या चॅनलायझेशन करीता व लाकडी पुलाच्या बांधकामाकरीता आवश्यक असलेली जमीन वगळून उर्वरित ) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम, १९७१ मधील कलम २७, शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्रमांक एलसीएस १०८३ /१८८२/प्र.क्र. २२२/ग-४ दिनांक १२-५-१९८३ मधील

कृ.मा.प.

जिल्हाधिकारी मुंबई
उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,
दिनांक 17 APR 2002
आवक क्र.:- 4901
II A

आणि शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक एलसीएस १०९२/प्र.क्र. १७५/ज-१ दिनांक १८-१२-१९९२ मधील तरतुदीनुसार सदर जमिनीची जमीन मंजूरीच्या आदेशाच्या दिनांकाच्या लगतपूर्व १० वर्षे आधीच्या वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या बाजारमुल्यानुसार तात्पुरती किंमत प्रती चौ.मी. रु. १०९३/- इतकी मानुन या दराप्रमाणे सवलतीची कब्जेहक्काची किंमत वसूल करुन नेहमीच्या अटी / शर्तीवर तसेच खालील अतिरिक्त अटीवर देण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

**अट :-** सहायक संचालक, नगर रचना यांनी मंजूर जमिनीचे या आदेशाच्या दिनांकाच्या लगतपूर्व १० वर्षे आधीच्या वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेले बाजारमुल्य निर्धारित करावे. त्यानुसार तात्पुरती किंमत ही अंतिम किंमतीपेक्षा कमी असल्यास फरकाची रक्कम शासनाच्या याबाबत वेळोवेळी असलेल्या धोरणाप्रमाणे व्याजासह संस्थेकडून वसूल करण्यात यावी.

3 हे ज्ञापन नगर विकास विभाग,आणि वित्त विभागाच्या सहमतीने. (अनौपचारिक संदर्भ क्रमांक-प्र.क्र.४६२/०२/व्यय-९, दिनांक १५/४/२००२) निर्गमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विजय पाचकवडे)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१

**प्रतिलिपी :-**

१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर (लेखा परिक्षा)
४) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
५) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, मुंबई
६) वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय,मुंबई-३२.
७) कार्यासन अधिकारी, नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
८) निवडनस्ती, ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

<u>**परिशिष्ट अ**</u>

रुकृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेतील शासनाने मान्यता दर्शविलेल्या सभासद.
क्रमांक एलसीएस २६९४/प्र.क्र.५४५७/ज-३ दिनांक १५/४/२००२

१) श्री प्रकाश सोमा सावंत
२) श्री अरुण धोंडू बागते
३) श्रीमती पल्लवी प्रफुल नरवणकर
४) श्री मंगेश काका सकट
५) श्रीमती शिल्पा सुरेंद्र शिंदे
६) श्री देवदास धोंडू पुरव
७) श्री रमेश जी. इप्पा
८) श्री चंद्रकांत विठ्ठल मोरे
९) श्री श्रीकांत रामकृष्ण देसाई
१०) श्री राजेश आर. सावंत.

(श्री. विजय पांचकवडे)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

**प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१**

Ph.6556799, 6550111 Fax : 6556805 email address:- collrmsd@yahoo.com


क्र. :- ०७/३अ/एफ-१५२
दिनांक :-९३/०६/२००४

वाचले : १) शासन महसुल व वन विभागाचे हेतुपत्र क्र.एलसीएस-२६९४/प्र.क्र.५४५७/ज-३ दि.१२/१२/९४
व आदेश समक्रमांक दि.१५/४/०२
२) या कार्यालयाचे आदेश क्र.०७/३अ/एफ-१५२ दि.२४/४/२००० व दि.८/४/०४ व दि.१५/४/०४
३) या कार्यालयाचे पत्र दि.११/६/०२ व २९/७/०३
४) शासन महसुल व वन विभागाचे पत्र क्र.एलसीएस/२६९४/प्र.क्र.५४५७/ज-३ दि.३/७/०३
५) संस्थेची पत्रे दि.२६/८/०३, १७/१०/०३, १/१/०४, १/३/०४, १९/३/०४

आदेश :

गुरुकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था या संस्थेस तिच्या १३ सभासदांच्या निवासाची व्यवस्था करण्याकरीता मौजे
परिघखार येथील स.नं.४ पै, न.भु.क्र.८ पै मधील ८५३.६ चौ.मी. जमीन (या पैकी मिठी नदीच्या चॅनेलायझेशन व लाकडी
बांधासाठी लागणारी जमीन वगळुन) मंजुर करण्याचा शासनाचा हेतु असल्याचे संस्थेस शासनाचे हेतुपत्र दि.१२/१२/९४
अन्वये कळविण्यात आले होते. त्यानंतर सदरचे हेतुपत्र रद्द करुन प्रश्नाधिन जमीन सुर्यप्रकाश सहकारी गृहनिर्माण संस्थेस
निवासी प्रयोजनाकरीता देण्याचा शासनाचा हेतु असल्याचे हेतुपत्र समक्रमांकाच्या दि.१८/१२/९६ अन्वये देण्यांत आले होते.
शासनाचे वरील निर्णया विरुध्द गुरुकृपा सह.गृह.नि. संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक
३४४/९७ व ९२९/९८ यामध्ये न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे शासनस्तरावर सर्व संबंधितांना पुन्हा सुनावणीची संधी
देण्यांत आली होती. प्रस्तुतच्या प्रकरणी मा. मंत्री (महसुल) यांनी सुर्यप्रकाश सहकारी गृहनिर्माण संस्था यांना दि.१८/१२/९६
अन्वये दिलेले हेतुपत्र रद्द करुन, गुरुकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था यांना दिलेले दि.१२/१२/९४ चे हेतुपत्र कायम करण्यांचा
व दि.१८/६/१९९६ च्या शासनपत्रान्वये दिलेले स्थगिती आदेश उठविण्याचा निर्णय दि.१३/४/२००० रोजी घेतला व तसे सर्व
संबंधितांना कळविण्यांत आले आहे.

तद्नुषंगाने गुरुकृपा सह.गृह.नि.संस्था या संस्थेस परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या १० शासन मान्यता प्राप्त
सभासदांच्या निवासाची व्यवस्था करण्याकरीता मौजे परिघखाडी येथील सर्वे क्र.४ पै. न.भु.क्र.८ पै मधिल ८५३.६ चौ.मी.
जमीन (यापैकी मिठी नदीच्या चॅनलायझेशनकरीता व लाकडी पुलाकरीता पुलाच्या बांधकामाकरीता आवश्यक असलेली
जमीन वगळुन उर्वरीत) महाराष्ट्र जमीन महसुल (सरकारी जमीनीची विल्हेवाट) नियम १९७१ मधील कलम २७, शासन
परिपत्रक, महसुल व वन विभाग क्र.एलसीएस-१०८३/१८८२/प्रक्र.२२२/ज-४ दि.१२/५/८३ मधिल आणि शासन निर्णय,
महसुल व वन विभाग क्र.एलसीएस-१०९२/प्र.क्र.६७५/ज-१ दि.१८/१२/९२ मधील तरतुदीनुसार सदर जमीनीची जमीन
मंजुरीच्या आदेशाच्या दिनांकाच्या लगतपुर्व १० वर्षे आधीच्या वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या
बाजारमुल्यानुसार तात्पुरती किंमत रु.१०९३/- प्रती चौ.मी. इतकी मानुन सवलतीची कब्जेहक्काची रक्कम वसुल करुन
नेहमीच्या अटी व शर्तीवर देण्यांस शासनाने मान्यता दिली आहे.

तद्वतच, गुरुकृपा स.गृ.नि.संस्थेस निवासी प्रयोजनाकरीता मंजूर करण्यांत आलेली मौजे परिघखाडी, स.नं.
४ पै, न.भू.क्र.८ पै. मधील जागा केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी
दि.१९/१/२००० रोजी मंजुर केलेल्या किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडयानुसार सीआरझेड-२ वर्गीकरणात समाविष्ट असुन
एचटीएल लगत आहे. त्यामुळे या जमीनीवर बांधकाम अनुज्ञेय करता येत नाही. तथापि केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन
विभागाने दि.८/९/९० रोजी केलेल्या खुलासानुसार संदर्भित भूखंडाच्या दक्षिण हद्दीलगतच्या भूखंडावर दि.१९/२/१९९१ पूर्वी
अधिकृत इमारती असल्या तरच त्या इमारतीच्या खाडीलगत भागात जोडणाऱ्या काल्पनिक रेषेच्या (Imaginary Line)
जमीनीकडील भागात दि.१९/२/१९९१ रोजी अस्तीत्वात असलेल्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीनुसार (सन १९६७ ची
नियमावली) जागेवर बांधकाम अनुज्ञेय करता येईल असे शासन नगर विकास विभागाने स्पष्ट केले आहे.

गुरुकृपा सह.गृह.नि. संस्थेने जमीनीची तात्पुरती क.ह.र. रु.८,३०,२६३/- भरणा केली असुन, प्रश्नाधिन जमीनीचे अंतीम मुल्यांकन करण्यांत आल्यानंतर त्यानुसार आकारणेत येणारी अंतिम किंमत तात्पुरत्या किंमतीपेक्षा जास्त आल्यास फरकाची रक्कम व्याजासह भरण्यांबाबत संस्थेने जरुर ते हमीपत्र मुद्रांकित पेपरवर सादर केले आहे. त्याचप्रमाणे संस्थेची सहकारी कायदयांतर्गत नोंदणी करण्यांत आली असुन नोंदणी क्र.एमयुएम-३/डब्ल्युएल/एचएसजी/(टीसी)/९०६८/२००४-२००५/सन-२००४ दि.२८/४/२००४ देण्यांत आला आहे. संस्थेस मंजुर करण्यांत येत असलेल्या जमीनीचे अतिक्रमणापासुन संरक्षण करण्याकामी कुंपण घालणेस दि.२४/४/२००० च्या आदेशान्वये परवानगीसुध्दा देण्यांत आली आहे. या कार्यालयाचे पत्र समक्रमांक दि.११/६/०२ मधिल अटी व शर्ती तसेच संस्थेबरोबर ज़मीन प्रदानाकामी करण्यांत यावयाच्या करारनाम्यातील अटी व शर्ती व शासन महसुल व वन विभागाचे सुधारीत धोरण दि.९/७/९९ मधिल अटी व शर्ती संस्थेवर बंधनकारक रहातील, या अटिस अधिन राहुन परिशिष्ट अ मध्ये दर्शविण्यांत आलेल्या मंजुर सभासदांच्या निवासाची,व्यवस्था करण्याकामी,संस्थेस मौजे परिघखार स.नं.४ पै. न.भू.क्र.८ पै मधिल ८५३.६ चौ.मी. जमीन (त्यापैकी मिठी नदीच्या चॅनलायझेशनसाठी व लाकडी बांधासाठी लागणारी जमीन वगळुन) याव्दारे मंजुर करण्यात येत आहे. संस्थेने जमीनीचा रितसर ताबा नगर भुमापन अधिकारी, वांद्रे यांचेकडुन घ्यावा.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

21.6.04

प्रती :
सचिव
गुरुकृपा स.गृ.नि.संस्था (म),
न.भू.क्र.८ पै, सर्वे क्र.४ शिक्षक नगर,
एलबीएस रोड, कुर्ला (प), मुंबई-४०० ०७०

प्रत :
१)मा. प्रधान सचिव (महसुल)
महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीकरीता सविनय सादर
२) तहसिलदार अंधेरी यांचेकडे माहीतीकरीता व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता रवाना
३) नगर भूमापन अधिकारी यांचेकडे माहीतीकरीता सविनय सादर.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

21.6.04

१२१

3

# परिशिष्ट - अ

गुरुकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था (म) या संस्थेस आदेश क्र.०७/३अ/एफ-१५२
दिनांक /६/०४ अन्वये मंजुर केलेल्या जमीनी संदर्भात मान्यताप्राप्त सभासदांची यादी.

| अ.क्र. | नांव |
|---|---|
| १ | श्री. प्रकाश सोमा सावंत |
| २ | श्री. श्रीकांत सावळाराम मोरे |
| ३ | श्री. शिरीष ल. साळवी |
| ४ | श्री. गणेश नामदेव भोईर (मागासवर्गीय) |
| ५ | श्री. यशवंत अर्जुन साळम |
| ६ | श्री. यशवंत मुरलीधर शिवापुरकर |
| ७ | श्री. संतोष सत्यवान मांजरेकर |
| ८ | श्री. चंद्रकांत वि. मोरे (मागासवर्गीय) |
| ९ | श्री. नरेंद्र चंद्रकांत सावंत |
| १० | कु. प्रिती मेनन |
| ११ | कु. मंजुळा भास्कर नायर |

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

21.6.04